**प्रकल्प प्रवर्तक मे. विटमन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २०/२, गाव - बिलोशी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सिंथेटिक एस्टर, जनरल प्लास्टीसायझर्स, स्पेशालिटी प्लास्टीसायझर्स, फायर रिटार्डट प्लास्टीसायछझर्स तसेच वंगण आणि वंगण तेल उत्पादन उभारणी प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. विटमन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २०/२, गाव - बिलोशी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सिंथेटिक एस्टर, जनरल प्लास्टीसायझर्स, स्पेशालिटी प्लास्टीसायझर्स, फायर रिटार्डट प्लास्टीसायछझर्स तसेच वंगण आणि वंगण तेल उत्पादन उभारणी प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता प्रकल्प स्थान गट क्रं. २०/२, गाव - बिलोशी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री किशोर केर्लीकर, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री गोविंद बोडके, जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री बाबासाहेब कुकडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. भवानजी आगे पाटील, उपविभागीय दंडाधिकारी (प्रांत), वाडा, जिल्हा-पालघर, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी

संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. विटमन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २०/२, गाव - बिलोशी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांचा प्रस्तावित सिंथेटिक एस्टर, जनरल प्लास्टीसायझर्स, स्पेशालिटी प्लास्टीसायझर्स, फायर रिटार्डट प्लास्टीसायछझर्स तसेच वंगण आणि वंगण तेल उत्पादन उभारणी प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए, ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार, नवी दिल्ली येथील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १५ जुलै, २०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रदान केलेली आहे.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास मंगळवार , दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-७३/२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०९२१एफटीएस०१६४ दिनांक २१/०९/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, पालघर किंवा त्यांचे प्रतिनिधी - **अध्यक्ष**

अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी,कल्याण-३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक सकाळ (मराठी) व फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी) या वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत दिनांक ०९-०९-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर,

५) उप विभागीय अधिकारी-वाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-वाडा, तालुका-वाडा,जिल्हा-पालघर,

७) तहसीलदार, तहसील कार्यालय,वाडा,, जिल्हा- पालघर,

८) सरपंच, ग्रुप-ग्रामपंचायत, बिलोशी, तालका-वाडा, जिल्हा- पालघर

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२,

१०) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे,

१२) उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म.प्र.नि. मंडळास ईमेलव्दारे व पत्राव्दारे एकही आक्षेप प्राप्त झाला नसल्याचे आयोजकाने सांगितले.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी स्वरुपात सुनावणी दरम्यान देण्यात याव्या असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय विभाग, मंबई यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचा गुंतवणूक ही ४८ कोटी असून सुमारे १०० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळू शकतो. त्याचप्रमाणे

सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसाय व रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**<u>खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/स्पष्टीकरण/आश्वासने: -</u>**

१) **<u>श्री महेश एकनाथ घरत, राहणार-बिलोशी,तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-</u>**
सादरीकरणात दाखविलेली सांडपाणी नियंत्रण योजना ही प्रत्यक्षात अंमलात आणावी. नुसती कागदावर असू नये. कारण आजूबाजूच्या शेतीचे नुकसान होऊ नये. ब-याच वेळा असे दिसते की सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित नसते, सांडपाणी प्रकल्पाच्या बाहेर, शेजारील शेतात जात असते व पीकांचे ब-याच प्रमाणात नुकसान होते.
**पर्यावरण सल्लागार** यांनी माहिती दिली की सदरहू प्रकल्प हा शून्य निष्कासन सांडपाणी (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. प्रकल्पात निर्माण होणा-या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच वापर करण्यात येणार आहे.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सदरहू प्रकल्पास प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतचे संमती पत्र (Consent to Operate) प्रदान करण्यापूर्वी सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित आहे की नाही याची तपासणी करते व नंतरच प्रकल्प सुरु करण्यास परवानगी दिली जाते.

२) **श्री राहूल रविंद्र भोईर, राहणार-बिलोशी,तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

प्रस्तावित प्रकल्प सुरु झाल्यानंतर किती लोकांना रोजगार मिळू शकतो?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्पात सुमारे १०० (शंभर) लोकांना रोजगार मिळेल.

३) **श्री अमोल पाटोळे, राहणार-बिलोशी,तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

या प्रकल्पात पाणी प्रदूषण होईल काय? झाल्यास त्यावर काय उपाय योजना करण्यात येतील?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उत्पादन प्रक्रियेमधून प्रदूषित पाणी निर्माण होईल. त्यासाठी घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी एसटीपी (STP - Sewage Treatment Plant) आणि औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ईटीपी (ETP- Effluent Treatment Plant) कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा १००% उत्पादन प्रकियेत पुनर्वापर करण्यात येणार असून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही.

४) **श्री रविंद्र रानडे, राहणार-बिलोशी,तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

प्रकल्प मालकानी पर्यावरणाविषयी जी व्यवस्था केलेली आहे, ती अतिशय योग्य आहे. त्याप्रमाणे त्यांनी त्याचे नियोजन करावे.

५) **श्री बाबासाहेब कुकडे, सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

सदस्य, यांनी पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की या परिसरात स्टील उद्योग मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे स्थानिकांना स्टील उद्योग कसे असतात

याची माहिती आहे. परंतु स्थानिकांना समजेल अशा भाषेत प्लास्टीसायझर्स म्हणजे काय, त्याचा उपयोग कुठे होणार याविषयी माहिती द्यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की जे मूळ प्लास्टीक असते, ते कडक असते ते मऊ करण्याचे काम प्लास्टीकसायझर करते. प्लास्टीकसायझरचा उपयोग प्लास्टिक. रबर इत्यादी पदार्थांमध्ये मऊपणा आणण्यासाठी होतो.

६) **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

उत्पादन प्रक्रियेत काही केमिकलचा वापर होणार आहे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात कुठलेही घातक केमिकल वापरले जाणार नाही. फक्त साधे केमिकल (Normal Chemical) वापरणार आहोत. ज्याचा वापर सामान्य माणसे करतात.

त्याशिवाय प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकल्पामुळे कुठलेच जल प्रदूषण होणार नाही.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी केमिकलचे नांव सांगण्याची सूचना केली. त्यांनी पुढे शंका विचारली की जरी आपण प्रकल्पाबाहेर सांडपाणी सोडणार नसले तरी ते पाणी जमीनीत मिसळेल व शेजारील शेती खराब होईल.

यावर उत्तरादाखल प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही बेसिक केमिकल्स म्हणून प्रकल्पात मुख्यतः अल्कोहोल आणि ऍसिडचा वापर करणार आहोत. हे फॅटी ॲसिड्स हे वनस्पतीजन्य असतील. सदरहू केमिकल जमिनीत मिसळणार नाही याची पुरेपुर काळजी घेऊ. जरी नजरचूकीने पडले, तरी ते प्रकल्पात खाली सिमेट कॉक्रीटचा फ्लोअर नियुक्त जागेत (dyked area) जमा होईल. त्यामुळे कुठलेही जलप्रदूषण होणार नाही.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी विचारणा केली की ते जमिनीत मिसळणार नाही याबाबत आपला अभ्यास आहे वा एखादा केस स्टडी रिपोर्ट आहे का?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की याबाबत अभ्यास केला असून सदरहू केमिकल्स ही water insoluble आहेत. ते पाण्याच्या पृष्ठभागावर राहतात. त्याची घन कचरा (solid waste) स्वरुपात विल्हेवाट लावण्यात येईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले तो घन कचरा कुठेही टाकल्यामुळे जास्तच घातक व हानीकारक होईल.

यावर **पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की त्यासाठी घातक घन कच-यासाठी केंद्र व राज्य शासनाची तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची नियमावली आहे, त्यानुसार सदरहू घातक घन कचरा हा Common Hazardous Waste Treatment, Storage & Disposal Facility (CHWTSDF), तळोजा येथील सामाईक घातक घनकचरा प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येईल.

अध्यक्ष यांनी येथे मत मांडले की जनसुनावणीचा मुख्य उद्देश प्रकल्पग्रस्त व बैठकीस येणा-या सामान्य लोकांना प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण व्यवस्थापन योजना समजून सांगणे हा आहे. त्यांना समजेल अशा भाषेत ते सांगण्यात आले पाहिजे. ही जनसुनावणी पर्यावरण समितीसाठी नाही. आपल्या प्रकल्पात किती सांडपाणी निर्माण होईल, किती प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा पुनर्वापर करणार आहात, किती केमिकलचा घन कचरा निर्माण होईल त्यावर प्रक्रिया कशी करण्यात येईल ही माहिती बैठकीत सांगणे अपेक्षित आहे.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प उत्पादनात घातक घन कचरा (Solid HW) व घनकचरा (Solid Waste) हे वेगळे/विभाजन करण्यात येतील. हा घातक घन कचरा (Solid Hazardous Waste) आपल्या प्रकल्पात किंवा दुसरीकडे प्रक्रिया करण्याची परवानगी नाही. सदरहू घातक घन कचरा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार तळोजा येथील Common Hazardous Waste Treatment, Storage & Disposal Facility

(CHWTSDF) तळोजा येथील सामाईक घातक घनकचरा प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येईल. तेथे त्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया, साठवण व विल्हेवाट लावण्यात येते. त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी लागते.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की सादर केलेल्या सारांश दरम्यान आपण फर्नेस ऑईलचा वापर करणार असल्याचे नमूद केले आहे. तथापि, ते वापरण्यास परवानगी नाही. तरी त्याबाबत अहवालात सुधारणा करण्यात यावी.

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की अहवालात सुधारणा करण्यात आलेली आहे. आम्ही फर्नेस ऑईल (FO) ऐवजी LSHS (Low Sulphur Heavy Stock) वापरणार आहोत.

७) **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की औद्योगिक सांडपाणी निर्मिती ३९.० घनमीटर प्रति दिन तर घरगुती सांडपाणी १३.० घनमीटर प्रतिदिन दाखविण्यात आलेली आहे. तर सांडपाणी पुनर्वापर ६४.० घनमीटर प्रतिदिन दाखवले. शिवाय टक्केवारी ही ८०% दाखविले आहे. सादरीकरणातील पान नं. १५ पाहण्यास सांगितले. त्याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

**सदस्य** यांनी सांगितले की ३७.० घनमीटर हे हरितपट्टा विकासासाठी वापरण्यात येईल. म्हणजे आपण पुनर्वापर करणार नाही का अशी विचारणा केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी माहिती दिली की प्रकल्पामधून ३९.० घनमीटर प्रतिदिन औद्योगिक सांडपाणी तयार होईल. त्यावर प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया केली जाईल. २.० घनमीटर प्रतिदिन एवढा गाळ (sludge) तयार होईल व ३७.० घनमीटर प्रतिदिन प्रक्रिया केलेले पाणी तयार होईल, ज्याचा पुनर्वापर प्रकल्पातील हरितपट्टा क्षेत्र विकासासाठी केला जाईल.

**सदस्य** यांनी एमईईमध्ये काय करणार याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की प्रकियेतून निघणारे सांडपाणी हे एमईई (MEE-Multi Effective Evaporator) तसेच ATFD मध्ये प्रक्रिया करुन त्याचा

पुनर्वापर प्रक्रियेसाठी तसेच कूलिंग टॉवरसाठी करण्यात येईल. सदस्य यांनी त्यामध्ये सांडपाणीसुध्दा आहे काय याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांडपाणी नसल्याचे सांगून ते प्रक्रियेमध्ये पुन्हा वापरणार असल्याचे सांगितले आहे.

८) **श्री महेश घरत, राहणार-बिलोशी, तालुका- वाडा, जिल्हा-पालघरः-**

प्रकल्पात जो बॉयलर वापरात येणार आहे, तो कोल फायर आहे का ऑईल फायर आहे का बगॅस फायर आहे? त्या चिमणीची उंची किती आहे?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले प्रकल्पात LSHS (Low Sulphur Heavy Stock) बॉयलर वापरणार आहोत. ब्रॉयलरसाठी चिमणीची उंची ही 3० मीटर, LSHS फर्नेससाठी ३० मीटर, डी.जी सेट साठी १२ मीटर, $H_2S$ स्क्रबरसाठी १२ मीटर आहे.

यावर **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की त्रोटक उत्तरे न देता सविस्तर उत्तरे दयावी.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की बॉयलरची क्षमता आहे, ती १.० टीपीएच आहे. त्यामध्ये LSHS (Low Sulphur Heavy Stock) वापरण्यात येणार आहे. त्याची कार्यक्षमता ही ८९% तर चिमणीची उंची ही ३० मीटरची असेल, त्याचा व्यास हा २५० मिलीमीटरचा ठेवण्यात येणार आहे. याच्यात $SO_2$, NoX and PM या प्रकारचे प्रदूषके उत्पन्न होतात. ज्यासाठी चिमणी लावलेली आहे.

**प्रतिनिधी, उप प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ** यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनीही सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या काही शंका, सुचना वा आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावे.

९) **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी विचारणा केली की कार्यकारी सारांश अहवाल शेवटचे पान ३ पॉईंट - लिक्विड ईफ्ल्युएंट - ते जीपीसीबी का एमपीसीबी, ह्याचे उत्तर काय, ते चुकीचे आहे का याचं स्पष्टीकरण द्यावे.

**पर्यावरण सल्लागार** यांनी ही टंकलेखनाची चूक असल्याचे सांगितले.

**प्रतिनिधी, उप प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ** यांनी पुन्हा उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप.टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यांनी मा. अध्यक्षांना पुढील मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की आज आपण प्रस्तावित प्रकल्प मे. विटमन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रं. २०/२, गाव - बेलोशी, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर याच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी जमलो आहोत. त्यांनी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन सांगितले की कागी प्रकल्प स्थापन होण्याअगोदर शासनाच्या निर्देशांनुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. प्रकल्प कुठे सुरु होणार आहे, त्याचे उत्पादन, त्यामुळे पर्यावरणाला काही हानी होणार आहे का, प्रकल्प परिसरातील नागरिकांना काही त्रास होईल काय, होणार असल्यास त्यावर उपाययोजना याची माहिती जनतेस देण्यासाठी ही सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी विविध पर्यावरण कायद्यांनुसार परिसराचे सर्वेक्षण, विविध नमुने गोळा करुन त्याच्या चाचण्या घेतलेल्या आहेत. त्यावरील उपाययोजनांची माहिती दिलेली आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्पाच्या संचालकांना जिल्हा प्रशासनातर्फे सांगितले की प्रकल्पात जो काही रोजगार निर्माण होणार आहे तो मग कुशल, अर्धकुशल, अकुशल संवर्गातील असेल, तो स्थानिक लोकांनाच उपलब्ध करुन द्यावा. त्यांनी स्थानिकांना विनंती केली की स्थानिक लोक रोजगार मागण्यासाठी जातात. मात्र प्रत्येक प्रकल्पातील कामाचे एक वैशिष्ट्ये असते. ते कौशल्य असलेली व्यक्तीच ते काम करु शकतो. ते कौशल्य आत्मसात केले की प्रकल्प व्यवस्थापनासही संबंधित व्यक्तीस प्रकल्पात सामावून घेणे शक्य होते.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्प प्रशासनास विनंती केली की जरी आपण पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) राबविणार आहात, तरी प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर व स्थापनेनंतर विविध कामांमुळे स्थानिक रस्त्यांवर वाहतुकीची वर्दळ वाढते. वाहतुकीवर ताण पडतो. तरी स्थानिक रस्त्याची काळजी घेण्यात यावी. प्रकल्पासाठीचा सीएसआर निधी आहे, तो यासाठी खर्च करण्यात याव. भविष्यात परिसरातील रहिवाशांना जास्तीत जास्त नागरी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात म्हणजे शैक्षणिक, आरोग्य सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सर्व उपस्थितांना बैठकीच्या हजेरीपटावर स्वाक्षरी करण्याचे आवाहन केले. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व मा. अध्यक्षांच्या संमतीने बैठकीचे इतिवृत, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, लेखी सूचना यासह म.प्र.नि.मंडळ मुख्यालयातर्फे ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती ही त्यावर पुढील निर्णय घेईल. त्यांनी मा. अध्यक्षांच्या संमतीने जनसुनावणी संपन्न झाली असे जाहिर केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून ही जनसुनावणी संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सोबत प्राप्त झालेले लेखी सूचना/आक्षेप : ०२ जोडण्यात आलेले आहेत.

**(किशोर केर्लीकर)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
कल्याण-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(गोविंद बोडके, भाप्रसे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, पालघर,
जिल्हा-पालघर